# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – ४११ ०१८,

## अग्निशामक विभाग,

**मानधन तत्वावर ६ महिने मुदतीसाठी करार पध्दतीने फायरमन/वाहनचालक नेमणूक करणेबाबत.**

**जाहीरात क्रमांक १५०/२०१६** **दि. ०८/१०/२०१६**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशामक विभागामार्फत ६ महिने मुदतीसाठी अग्निशामक विभागाकडील करारपद्धतीने मानधन तत्वावर फायरमन / वाहनचालकांची पदांकरिता प्रस्तुत जाहिरातीतील नमूद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अहर्ता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| तपशील | अनु.जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फायरमन | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ | ०४ |
| वाहनचालक | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ०१ | ०५ | ०९ |

**फायरमन – (मानधन र. रु. १५,०००/-)**

**शैक्षणिक अर्हता** :-

१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम अथवा किमान तितक्याच कालावधीचा, शासन मान्य संस्था / शासन मान्य तत्सम कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) उत्तम पोहता येणे व बुडी मारणे आवश्यक.

४) एम.एस.सी.आय.टी.परीक्षा उर्तीण असल्यास प्राधान्य.

५) जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य.

६) अनुभव असल्यास प्राधान्य.

७) मराठीचे ज्ञान आवश्यक.

वय – शासकीय नियमाप्रमाणे लागु.

**वाहनचालक – (मानधन र.रु १८,०००/-)**

**शैक्षणिक अर्हता** :-

१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम अथवा किमान तितक्याच कालावधीचा, शासन मान्य संस्था / शासन मान्य तत्सम कोर्स उर्तीण असणे आवश्यक आहे.

३) जड वाहन चालविण्याचा वैध परवाना आवश्यक.

४) जड वाहनचालक म्हणून किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.

५) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक.

वय – शासकीय नियमाप्रमाणे लागु.

अटी व शर्ती :-

१) करारपध्दतीने नेमलेल्या फायरमन/वाहनचालकांची नेमणुक ही ६ महीने मुदतीची असेल. त्यामूळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही अथवा या संदर्भात न्यायालयात दाद मागता येणार नाही. याबाबतचे र.रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर हमीपत्र सादर करावे लागेल.

२) उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व व्यवसायीक अर्हता विषयक प्रमाणपत्र, जातीचा दाखला / जात प्रमाणपत्र, अनुभव, इत्यादी कागदपत्रांच्या स्वसांक्षांकित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

३) अग्निशामक विभांगास सदर पदांची आवश्यकता नसेल तेव्हा कोणत्याही नोटीशी शिवाय, सदर उमेदवारांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल. या संबधीची सर्व अधिकार अग्निशामन विभागाने राखुन ठेवले आहे.

**४)** वरील प्रवर्ग निहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार अग्निशमन विभागास राहील

५) **उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात पदांसाठी अर्ज मा.मुख्य अग्निशमन अधिकारी,जनरल अरुणकुमार वैदय मुख्य अग्निशमन केंद्र, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८ या नावाने करावा. सदर अर्ज दि. २१/१०/२०१६ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने पोहचतील अशा बेताने पाठवावेत.किवा कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावेत.**

६) निवड झालेल्या उमेदवारांस फायरमन र.रु.१५,०००/-(अक्षरी पंधरा हजार फक्त) प्रतिमहिना व वाहनचालक र.रु.१८,०००/-(अक्षरी अठरा हजार फक्त) प्रतिमहिना या एकत्रीत मानधना व्यतीरिक्त कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थीक लाभ देय राहणार नाही.

**७)** अर्जदाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाले असे नाही.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता/पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास, उमेदवारी अथवा निवड रदृबातल तसेच नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

८) **ज्या पदाकरिता अर्ज केलेला आहे. त्या पदाचे नाव पाकीटावर ठळक अक्षरांत लिहावे.**

९) दिलेल्या मुदतीनंतर पोस्टाने प्राप्त झालेल्या किंवा समक्ष सादर केले अर्जाचा विचार कोणत्याही परिस्थितीत केला जाणार नाही.

१०) पोस्टाने पाठविलेले अर्ज गहाळ झाल्यास अथवा विलंब झाल्यास, त्यांस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहीत नमुन्यात नसलेला अर्ज, अपुर्ण, चुकीचे कागदपत्रे जोडलेले व वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

११) उमेदवार निवडीसाठी कोणताही दबाव आणल्यास सदर उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

१२) अर्जदाराने आपले अर्ज महानगरपालिकेने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या विहीत नमुन्यामध्ये भरणे बंधनकारक राहील.

१३) अपूर्ण माहीती व अटींची पुर्तता न करणा-या उमेदवारांचे अर्ज बाद करुन अपात्र ठरविले जातील.अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील, त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४) सदरचे पद हे पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाचे आहे. यापदावर उमेदवारांस मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद आवश्यकतेनुसार फक्त ६ महीने मुदतीचे राहील.

१५) नियुक्ती वेळी उमेदवारांस रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर मनपा सेवेत भविष्यात नोकरीबाबतचा कोणताही हक्क राहणार नाही,तसेच मा.न्यायालयात दाद मागणार नाही, असे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१६) अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना पालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, त्याचे उमेदवाराने काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज करावेत. जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रीया कोणत्याही स्तरावर रदृ करण्याचा अंतिम निर्णय अग्निशामक विभागांस राहील.

सही /-
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

**<u>अर्जाचा नमुना</u>**

पासपोर्ट साईज फोटो

**प्रति,**
**मा.मुख्य अग्निशमन अधिकारी,**
**जनरल अरुणकुमार वैदय मुख्य अग्निशमन केंद्र,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८.**

**<u>विषय :- ---------------- पदावर मानधनावर नेमणुकीबाबत</u>.**

महोदय,

संदर्भीय दिनांक ०८/१०/२०१६ जाहिरातीनुसार मी (संपुर्ण नांव) ---------------------------------------------------- या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असुन, या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडीलांचे/पतीचे नाव

१.संपुर्ण नाव ---------------------------------------------------------------------------------------

२.पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता ---------------------------------------------------------------------------------------
(पिनकोडसह) ---------------------------------------------------------------------------------------

३.दुरध्वनी/मोबाईल क्र. -------------------------- / E-Mail ID(असल्यास)-----------------------------------

४.जन्मतारीख दि. / / (अक्षरी-----------------------------------------------------------------)

५.लिंग स्त्री/पुरुष

६.जात ----------------------------

७.जात प्रमाणपत्र क्रमांक ----------------------------

८.अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ/ संस्थंचे नांव | उर्तीण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी<br>अन्य. | | | | |
| २ | फायरमन पाठ्यक्रम | | | | |
| ३ | एम.एस.सी.आय.टी | | | | |

९. जड वाहन परवाना :क्र. .................................... कालावधी दिनांक .................................

१०.अनुभव असल्यास : कंपनीचे नांव : -------------------------------------------------------------
पदनांम : -------------------------------------------------------------
कालवधी : -------------------------------------------------------------

वर नमुद केलेला तपशील खरा व बरोबर असुन त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन् आल्यास त्या माहितीच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही व नाव

सहपत्रे : १)
२)